# महाराष्ट्र शासन

## महसुल विभाग

### जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचे कार्यालयातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी तात्पुरत्या स्वरुपातील 1 (एक) रिक्त पद भरतीबाबत जाहीरात

जिल्हाधिकारी चंद्रपुर यांचे कार्यालयातील 1 (एक) तात्पुरत्या स्वरुपातील रिक्त पद एक वर्षाकरीता खुल्या स्पर्धेतुन भरावयाची आहेत. या पदासाठी पात्र उमेदवारांनी त्यांची शैक्षणीक अर्हता (गुणपत्रीका प्रत्येक विषयात उत्तीर्ण झाल्याबाबत जोडाव्या) अधिवास प्रमाणपत्र, जन्मातारखेचा दाखला, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन इत्यादी प्रमाणपत्रासह विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक 20 नोव्हेंबर 2023 पर्यंत पोस्टाव्दारे मागविण्यात येत आहेत. दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणारे (पोष्टाव्दारे प्राप्त अर्जासह) अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात येईल, लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची निवड यादी लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

### रिक्त पदे भरावयाच्या पदांचा तपशिल

| अ.क्र. | पदाचे नाव | ठोक वेतन | एकुण पद संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, चंद्रपुर | 45000/- प्रती महिना या व्यतीरिक्त कोणतेही भत्ते देय होणार नाही. | 1 (एक) | खुला |

**पात्रतेच्या अटी (महत्वाच्या सुचना) :-**

1) वरील पद तात्पुरत्या स्वरुपातील असुन एक वर्ष कालमर्यादेचे आहे. सदर पदास पुढील शासनाकडुन मुदतवाढ मिळण्याचे अटिवर भरण्यात येईल.
2) **शैक्षणिक अर्हता** – मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी/ पदव्युत्तर पदवी (सामाजीक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन)

**अनुभव :-** 1. आपत्ती व्यवस्थापनातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

2.मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असणे आवश्यक.

3.टिपणी लेखन, अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य.

4.संगणक हाताळण्याचे ज्ञान आवश्यक.

**वयोमर्यादा:-**

1. जाहीरातील नमुद केलेल्या पदाकरीता जाहीरातीच्या दिनांकास किमान 21 वर्ष पुर्ण व त्यावरील

**<u>अटी व शर्ती:-</u>**

1. छाननीअंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आले नाहीत. अशा उमेदवारांना लेखी परीक्षासाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.
2. उमेदवारांची 200 गुणांची लेखी परीक्षा आवश्यकतेनुसार घेण्यात येईल. लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावर प्रत्येकी 50 गुण याप्रमाणे बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेचे स्वरुप राहील. गुणवत्तेप्रमाणे पात्र ठरलेल्या किमान पाच उमेदवारांची मौखिक परिक्षा घेण्यात येईल व त्यातुन अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.
3. उमेदवारांना परिक्षेस येण्या जाण्याचा प्रवास खर्च दिला जाणार नाही.
4. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा (अधिवास प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक)
5. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
6. सदर पदांसाठी विहीत केलेल्या नमुन्यातील अर्ज करावे लागेल.
7. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदाच्या संख्येत बदल अथवा भरती रदद झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदाची संख्या, परिक्षेला स्थगीत करणे व रदद करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार प्रशासनाने राखुन ठेवलेले आहे. यावबत कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.
8. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहीती/अगर खोटी कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहीती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी, नियुक्ती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्ती झाल्यानंतर सुध्दा उमेदवारी/नियुक्ती रदद करण्यात येईल.
9. या जाहिरातीतील नमुद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.
10. सदर पदावर नियुक्ती शासनाकडुन पुढील मुदतवाढ प्राप्त झाल्यानंतर करण्यात येईल. पदाच्या नियुक्तीचा कालावधी ठरवण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.
11. लेखी परिक्षेत पात्र ठरुन निवड झालेल्या उमेदवाराची यादी परिक्षा झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपुर येथील नोटीस बोर्डवर तसेच <u>www.chanda.nic.in</u> या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

12. उमेदवाराने त्यांच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

13. सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-2000/17/2000/12 दिनांक 1.7.2005 नुसार लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

<u>**भरती बाबत आवश्यक सुचना :-**</u>

1. सोबत दिलेल्या नमुन्यात ए-4 आकाराच्या पांढ-या जाड कागदावर एकाच बाजुला हस्तलिखीत/टंकलिखीत व चक्रमुद्रित करुन अर्ज करावा. उमेदवारांनी अर्जातील माहिती तपशिल सुस्पष्टपणे नमुद करावा. उमेदवाराने ओळखपत्रातील छायाचित्राच्या आकाराचे त्यांचे अलिकडचे छायाचित्र आवेदन पत्रावर विहीत जागी घट्ट चिटकवावे. फोटो खाली योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी. शाळा सोडल्याचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, जन्माचा दाखला इत्यादीबाबत विहीत नमुन्यामध्ये माहिती भरुन पाठविलेली आवेदनपत्रे पुढील पत्यावर विहीत केलेल्या अंतीम तारखेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहचतील अशा बेताने पोस्टामार्फत पाठवावीत. विहीत तारीख व वेळनंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्जासोबत 10 सेमी × 22 सेमी आकाराचा स्वतःचा संपुर्ण पत्ता (पिनकोडसह) लिहिलेला व रु 5/- चे पोष्टाचे तिकीट लावलेला लिफाफा लेखी परीक्षेत बसण्याच्या प्रवेश पत्रासाठी पाठवावा. प्रत्येक उमेदवाराने अर्ज हे डाक नोंद पोच देय (Registered Acknowledgment) स्पीड पोस्टव्दारे, साध्या डाकेने पाठवावेत. टपाल खात्याची दिरंगाई अथवा अन्य कोणतेही कारण असो, कोणत्याही परिस्थितीमध्ये वर नमुद केलेले अर्ज स्विकारण्याचा अंतीम दिनांक काटेकोरपणे पाळल्या जाईल.
2. <u>**परीक्षा शुल्क:-**</u> सदर पदाच्या परिक्षेकरीता उमेदवारांनी रुपये 150/- इतके परिक्षा शुल्क अर्जासोबत भरावयाचे आहे. परीक्षा शुल्क डि.डि. (Demand Draft) स्वरुपात जिल्हाधिकारी चंद्रपुर यांचे नावाने राष्ट्रीयकृत बँकेचा चंद्रपुर येथे देय असलेला (Payable at Chandrapur) असणे आवश्यक राहील. सदर परिक्षा शुल्क हा ना-परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही. परिपुर्ण अर्जासोबत परिक्षा शुल्क डी.डी. स्वरुपात जोडण्यात यावा.
3. <u>**पत्र व्यवहाराचा पत्ता :-**</u> जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपुर -- पिन कोड -- 442 401

**<u>भरतीबाबत इतर आवश्यक सुचना</u>**

1) अर्जदाराने अर्जासोबत प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती जोडाव्यात, पदवी उत्तीर्ण झाल्याबाबत गुणपत्रीका जोडणे अनिवार्य आहे. (उदा. शैक्षणिक पात्रता, गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला, अधिवास प्रमाणपत्र जोडावे. (मुळ प्रती जोडु नये)
2) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.
3) आवेदनपत्र स्विकृत/ अस्विकृत करण्यात निवड प्रक्रियेत वेळेवर होणारे बदल, तसेच अंतीम निर्णय इत्यादी बाबतचे संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी/ नियुक्ती प्राधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे.
4) विहीत पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, विहीत नमुण्यात नसलेले अर्ज, मजकुर अपुर्ण व चुकीचे भरलेले अर्ज व स्वाक्षरी नसलेले अर्ज, आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या सांक्षाकित प्रती जोडले नसलेले अर्ज, विहीत शुल्क न भरलेले व फोटो नसलेले अर्ज, विहीत कालावधीत प्राप्त न झालेले अर्ज याप्रमाणे उणीवा असलेले अर्ज नाकारण्यात येईल.

**(विनय गौडा जी सी)**
**जिल्हाधिकारी चंद्रपुर**

<u>**अर्जाचा नमुना**</u>

**प्रति,**

**मा. जिल्हाधिकारी,**

**चंद्रपुर**

**पदाचे नाव :- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, चंद्रपुर**

<table>
<tr><td rowspan="2">1.</td><td colspan="2" rowspan="2">उमेदवाराचे पुर्ण नाव (प्रथम आडनाव)</td><td colspan="3">मराठीत</td><td colspan="3" rowspan="4">पासपोर्ट आकाराचा अलीकडे काढलेला फोटो येथे चिकटवावा, व स्वतःची स्वाक्षरी करावी</td></tr>
<tr><td colspan="3">इग्रजीत</td></tr>
<tr><td rowspan="2">2.</td><td colspan="2" rowspan="2">पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="2"></td><td>पिन कोड क्रं.</td></tr>
<tr><td>3.</td><td colspan="5">जात व प्रवर्ग</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>4.</td><td colspan="4">उमेदवार पुरुष आहे किंवा स्त्री</td><td>पुरुष</td><td>स्त्री</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>5</td><td colspan="4">जाहीरात प्रसिध्द रोजीचे वय</td><td colspan="4">जन्म दिनांक</td></tr>
<tr><td>6</td><td colspan="2">जन्म ठिकाण</td><td colspan="2">गाव</td><td colspan="2">तालुका</td><td colspan="2">जिल्हा</td></tr>
<tr><td rowspan="2">7</td><td colspan="2">(परिक्षा शुल्क) बँकेचे नांव</td><td colspan="2">डि.डि.क्रं.</td><td colspan="2">रक्कम</td><td colspan="2">दिनांक</td></tr>
<tr><td colspan="2"></td><td colspan="2"></td><td colspan="2"></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td rowspan="3">8</td><td colspan="8">शैक्षणिक अर्हता</td></tr>
<tr><td>अ.क्रं</td><td>परिक्षेचे नाव</td><td>विद्यापीठाचे नाव</td><td>विषय</td><td>परिक्षेत मिळालेले गुण</td><td>एकुण गुण</td><td>टक्केवारी</td><td>परिक्ष उत्तीर्ण वर्ष</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td colspan="8"></td></tr>
<tr><td>9</td><td colspan="4">मोबाईल नंबर :</td><td colspan="4">ईमेल -</td></tr>
</table>

## प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, आपले कार्यालयातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पद भरण्याबाबतची जाहीरात काळजीपुर्वक वाचली असुन सदर जाहीरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी असुन त्याची पृष्ठयर्थ प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती सोबत जोडल्या आहेत. वर नमुद केलेली माहिती चुकीची

अथवा खोटी आढळुन आल्यास माझी सदर पदाकरीता उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रदद होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती अधिका-यांचा निर्णय मला बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ :-

दिनांक :-

**उमेदवाराची स्वाक्षरी**

नोट :- 1. उमेदवाराने अर्जासोबत 10 सेमी*22 सेमी आकाराचा स्वतःचा संपुर्ण पत्ता (पिनकोडसह) लिहिलेला व रु. 5/- चे पोष्टाचे तिकीट लावलेला लिफाफा लेखी परीक्षेत बसण्याच्या प्रवेश पत्रासाठी पाठवावा.

2. डी. डी. क्रमांक, दिनांक व रक्कम :-.......................................

3. सदर अर्ज **जिल्हाधिकारी चंद्रपुर,पिन कोड** – 442401 या पत्यावर दिनांक 20/11/2023 पुर्वी पोस्टाद्वारे पोहचेल अशा रितीने पाठवा.